अष्टक १

ॐ नमो शिवा नमो शिव भोळा । परब्रह्म योगी, नंगाची सांवळा ॥
नाथांचा तू नाथ, मच्छिंद्र अवतार । उध्दराया भक्ता, येई वारंवार ॥ १ ॥

निजभक्तांसाठी कष्ट तू भोगिसी । संकटे तयांची, तूचि निवारिसी ॥
दृढभाव ज्यांचा, घेसी तूं कैवार । उध्दराया भक्ता, येई वारंवार ॥ २ ॥

अनंत नामाचा, अनंत देहाचा । चराचुरी भरला, आत्मा तो रुपाचा ॥
शिवदत्तन मी, तूचि दिगंबर । उध्दस्या भक्ता येई वारंवार ॥ ३ ॥

तेजोमय तुझे, प्रकाशीत रूप । ज्योतिची हि ज्योत, हृदयी अरुप ॥
दृष्टिसी भरला, आंत तूं बाहेर । उध्दराया भक्ता येई वारंवार ॥ ४ ॥

ऐसा तूं योगी, नाथाचा हा नाथ । नवविधा भक्ति, ज्ञानासी समर्थ ॥
सगुण निर्गुण, तूच निर्विकार । उध्द्राया भक्ता, येई वारंवार ॥ ५ ॥

हनुमंता राऊळी निःसंग राहिले । जप तप तुझे, नाही ते कळले ॥
निमग्न सदा, ब्रह्मानंदी थोर । उध्दराया भक्ता येई वारंवार ॥ ६ ॥

मागितो मी भीक, तुजप्रति देवा । सद्बुद्धि देई घडो तुझी सेवा ॥
तुझिया नामाचा, नसावा विसर । उध्दराया भक्ता, येई वारंवार ॥ ७ ॥

नमितो मी देवा, तुज भगवंता । भाग्य हीन माझे, दुर करी चिंता ॥
आल्या या जन्माचा, करावा उध्दार । उध्दराया भक्तां, येई वारंवार ॥ ८ ॥

म्हणे विश्वनाथ, लीन वृत्ती व्हावे । भावभक्ति प्रेमे, ईश्वरा भजावे ॥
ठेवावे चित्त, गुरुचरणावर । उध्दराया भक्ता येई वारंवार ॥ ९ ॥